**10.09.2024** प्रभातःमुरली ओम शांती बापदादा मधुबन

“गोड मुलांनो - मायेला वश करण्याचा मंत्र आहे - मनमनाभव, याच मंत्रामध्ये सर्व विशेषता सामावलेल्या आहेत, हाच मंत्र तुम्हाला पवित्र बनवितो”

प्रश्नः- आत्म्याच्या सेफ्टीचे एक नंबरचे साधन कोणते आहे आणि ते कसे?

उत्तरः- ‘आठवणीची यात्रा’ हेच सेफ्टीचे एक नंबरचे साधन आहे कारण या आठवणीनेच तुमचे कॅरेक्टर (चारित्र्य) सुधारते. तुम्ही मायेवर विजय प्राप्त करता. आठवणीद्वारे पतित कर्मेंद्रिये शीतल होतात. आठवणीनेच बळ मिळते. ज्ञान-तलवारीमध्ये आठवणीची धार (शक्ती) पाहिजे. आठवणीमुळेच गोड सतोप्रधान बनाल. तुम्ही कोणावरही क्रोध करणार नाही; त्यामुळे आठवणीच्या यात्रेमध्ये कमजोर बनायचे नाही. आपणच आपल्याला विचारायचे आहे की, ‘मी, किती वेळ आठवणीमध्ये राहतो?’

ओम् शांती. गोड-गोड रूहानी मुलांना दररोज इशारा जरूर द्यावा लागतो. कोणता इशारा? सेफ्टी फर्स्ट (आधी सुरक्षितता). सेफ्टी कोणती आहे? आठवणीच्या यात्रेमुळे तुम्ही खूप-खूप सुरक्षित राहता. मुलांसाठी हीच मुख्य गोष्ट आहे. बाबांनी समजावून सांगितले आहे - ‘तुम्ही मुले जितके आठवणीच्या यात्रेमध्ये तत्पर रहाल तितकी खुशी देखील राहील आणि संस्कार देखील ठीक होतील कारण पावन देखील बनायचे आहे’. कॅरेक्टर्स (चारित्र्य) देखील सुधारायचे आहे. आपली तपासणी करायची आहे - माझा स्वभाव कोणाला दुःख देण्यासारखा तर नाही ना! मला कोणता देह-अभिमान तर येत नाही ना? हे बारकाईने स्वतःला तपासायचे आहे. बाबा बसून मुलांना शिकवतात. तुम्ही मुले शिकता देखील आणि शिकवता देखील. बेहदचे बाबा फक्त शिकवतात. बाकी तर सर्व आहेत देहधारी; यामध्ये सारी दुनिया आली. एक बाबाच विदेही आहेत. ते तुम्हा मुलांना म्हणतात की, ‘तुम्हाला देखील विदेही बनायचे आहे. मी आलो आहे तुम्हाला विदेही बनविण्यासाठी’. पवित्र बनूनच तिथे (परमधाममध्ये) जायचे आहे. अपवित्रला तर सोबत घेऊन जाणार नाहीत त्यामुळे सर्वात पहिला मंत्रच हा देतात. मायेला वश करण्याचा हा मंत्र आहे. पवित्र होण्याचा हा मंत्र आहे. या मंत्रामध्ये खूप विशेषता भरलेल्या आहेत, याद्वारेच पवित्र बनायचे आहे. मनुष्यापासून देवता बनायचे आहे. जरूर आपणच देवता होतो म्हणूनच बाबा म्हणतात - ‘स्वतःची सेफ्टी पाहिजे असेल, मजबूत महावीर बनायचे असेल तर हा पुरुषार्थ करा’. बाबा तर शिकवण देत राहणार. भले मग ड्रामा देखील म्हणत राहतील. ड्रामा अनुसार सर्वकाही एकदम योग्यच चालले आहे आणि भविष्यासाठी देखील समजावून सांगत राहतील. आठवणीच्या यात्रेमध्ये कमजोर बनायचे नाही. बाहेर राहणाऱ्या बंधनात असलेल्या गोपिका जितकी आठवण करतात, तितके जवळ समोर राहणारे देखील आठवण करत नाहीत कारण त्यांची शिवबाबांना भेटण्यासाठी तडफड चालू असते. जे भेटतात त्यांचे तर जसे काही पोटच भरून जाते. जे खूप आठवण करतात, ते उच्च पद मिळवू शकतात. असे दिसून येते की, चांगले-चांगले, मोठ-मोठी सेंटर्स सांभाळणारे प्रमुख देखील आठवणीच्या यात्रेमध्ये कमजोर आहेत. आठवणीची धार (शक्ती) खूप चांगली पाहिजे. ज्ञान-तलवारीमध्ये आठवणीची धार नसल्याकारणाने कोणाला तिरच लागत नाही, पूर्णतः मरत नाहीत. मुले प्रयत्न करतात ज्ञानाचा बाण मारून बाबांचे बनवावे किंवा मरजीवा बनवावे. परंतु मरत नाहीत, तर जरूर ज्ञान-तलवारीमध्ये गडबड आहे. बाबा भले जाणतात - ड्रामा एकदम ॲक्युरेट चालू आहे, परंतु भविष्यासाठी तर समजावून सांगत राहतील ना. प्रत्येकाने आपल्या मनाला विचारा की, ‘मी कितपत आठवण करतो?’ आठवणीनेच बळ मिळेल म्हणून असे म्हटले जाते - ‘ज्ञान-तलवारीमध्ये धार (शक्ती) पाहिजे’. ज्ञान तर खूप सोप्या पद्धतीने समजावून सांगू शकता.

जितके-जितके आठवणीमध्ये रहाल तितके अतिशय मधुर बनत जाल. तुम्ही सतोप्रधान होता तेव्हा अतिशय मधुर होता. आता पुन्हा सतोप्रधान बनायचे आहे. तुमचा स्वभाव देखील अतिशय गोड पाहिजे. कधीही क्रोध करता कामा नये. असे वातावरण नसावे ज्यामुळे कोणी क्रोधीत होईल. असा प्रयत्न केला पाहिजे कारण हे ईश्वरीय कॉलेज स्थापन करण्याची सेवा खूप श्रेष्ठ आहे. भारतामध्ये विश्वविद्यालयाचे तर खूप गायन आहे. खरेतर ती

(दुनियेतील) काही विश्वविद्यालये नाही आहेत. विश्वविद्यालय तर एकच असते. बाबा येऊन सर्वांना मुक्ती-जीवनमुक्ती देतात. बाबा जाणतात - सर्व दुनियेमध्ये जे काही मनुष्य मात्र आहेत, सर्व खलास होणार आहेत. बाबांना बोलावले देखील यासाठी आहे की घाणेरड्या (अपवित्र) दुनियेचा विनाश आणि नवीन दुनियेची स्थापना करा. मुले देखील समजतात - खरोखर बाबा आलेले आहेत. आता मायेचा भपका केवढा आहे. फॉल ऑफ 'पाम्पिया'चा खेळ देखील दाखवतात. मोठ-मोठे बंगले इत्यादी बनवत आहेत - हा आहे भपका. सतयुगामध्ये इतक्या मजल्यांची घरे बनत नाहीत. इथे बनतात कारण राहण्यासाठी जमीन कमी पडते. विनाश जेव्हा होतो तेव्हा सर्व मोठ-मोठ्या बिल्डिंग देखील कोसळतात. आधी इतक्या मोठ्या-मोठ्या बिल्डिंग बनत नव्हत्या. बॉम्ब्स जेव्हा टाकतील तेव्हा या बिल्डिंगा अशा काही कोसळतील जसे की पत्त्यांचे घर कोसळते. याचा अर्थ असा नाही की तेच मरतील बाकीचे वाचतील. नाही, जो जिथे असेल मग तो समुद्रावर असेल, पृथ्वीवर असेल, आकाशामध्ये असेल, डोंगरांवर असेल, नाहीतर उडत असेल... सगळेच खलास होणार. ही जुनी दुनिया आहे ना. ज्याकाही ८४ लाख योनी आहेत, त्या सर्व खलास होणार आहेत. तिथे नवीन दुनियेमध्ये हे काहीही असणार नाही. ना इतके मनुष्य असणार, ना मच्छर, ना जीवजंतू इत्यादी असणार. इथे तर प्रचंड प्रमाणात आहेत. आता तुम्ही मुले देखील देवता बनत आहात तर तिथे प्रत्येक वस्तू सतोप्रधान असते. इथे देखील श्रीमंत व्यक्तीच्या घरी जाल तर खूप स्वच्छता इत्यादी असते. तुम्ही तर सर्वात मोठे देवता बनत आहात, तुम्हाला मोठी व्यक्ती देखील म्हणणार नाही. तुम्ही खूप उच्च देवता बनता, ती काही नवीन गोष्ट नाहीये. ५ हजार वर्षांपूर्वी देखील तुम्ही नंबरवार बनला होता. हा इतका कचरा वगैरे तिथे काहीही नसणार. मुलांना अतिशय आनंद होतो - आम्ही खूप उच्च देवता बनतो. आम्हाला शिकविणारे एक बाबाच आहेत जे आम्हाला खूप श्रेष्ठ बनवतात. शिक्षणामध्ये नेहमी नंबरवार पोझिशनवाले असतात. कोणी कमी शिकतात, कोणी जास्त शिकतात. आता मुले पुरुषार्थ करत आहेत, मोठ-मोठी सेंटर्स उघडत आहेत अशासाठी की मोठ्या-मोठ्यांना माहिती व्हावी. भारताच्या प्राचीन राजयोगाचे देखील गायन आहे. खास परदेशी लोकांना राजयोग शिकण्याची जास्त उत्सुकता असते. भारतवासी तर तमोप्रधान-बुद्धी आहेत. ते (विदेशी) तरीही 'तमो-बुद्धी' आहेत म्हणून त्यांना आवड असते भारताचा प्राचीन राजयोग शिकण्याची. भारताचा प्राचीन राजयोग प्रसिद्ध आहे, ज्याद्वारेच भारत स्वर्ग बनला होता. फार थोडे येतात, ज्यांना पूर्णपणे समजते. स्वर्ग हेवन होऊन गेला, तो पुन्हा होणार जरूर. हेवन अथवा पॅराडाईज आहे सर्वात वंडर ऑफ वर्ल्ड. स्वर्गाचे नाव किती प्रसिद्ध आहे. स्वर्ग आणि नरक, शिवालय आणि वेश्यालय. मुलांना आता नंबरवार आठवण आहे की आपल्याला आता शिवालयामध्ये जायचे आहे. तिथे जाण्यासाठी शिवबाबांची आठवण करायची आहे. सर्वांना घेऊन जाणारे तेच पंडा (मार्गदर्शक) आहेत. भक्तीला म्हटले जाते - रात्र. ज्ञानाला म्हटले जाते - दिवस. ही बेहदची गोष्ट आहे. नवीन वस्तू आणि जुन्या वस्तूमध्ये खूप फरक असतो. आता मुलांना वाटते - इतके सर्वश्रेष्ठ शिक्षण, चांगल्या भारदस्त इमारतीमध्ये आपण शिकवले तर मोठ-मोठ्या व्यक्ती येतील. प्रत्येकाला स्वतंत्रपणे बसून समजावून सांगावे लागते. वास्तविक अभ्यासासाठी अथवा शिक्षणासाठी असणारे स्थान एकांतामध्ये असते. ब्रह्मज्ञानींचे आश्रम देखील शहराच्या बाहेर दूर असतात आणि ते खाली जमिनीवरच कुटिया बनवून राहतात. शहरातल्या सारखे इतक्या वरच्या मजल्यावर राहत नाही. आता तर तमोप्रधान झाल्यामुळे शहरांमध्ये घुसले आहेत. ती ताकद संपलेली आहे. यावेळी सर्वांची बॅटरी रिकामी झाली आहे. आता बॅटरीला कसे भरायचे आहे - ही बॅटरी बाबांशिवाय इतर कोणीही चार्ज करू शकणार नाही. मुलांना बॅटरी चार्ज केल्यानेच ताकद येते. त्यासाठी मुख्य आहे आठवण. यामध्येच मायेची विघ्ने पडतात. कोणी मग सर्जन समोर खरे सांगतात, कोणी लपवून ठेवतात. आपल्यामध्ये जे दोष आहेत, ते तर बाबांना सांगावे लागतील. या जन्मामध्ये जी पापे केली आहेत, ती अविनाशी सर्जनसमोर कबूल केली पाहिजेत, नाहीतर मन आतमध्ये खात राहील. ऐकविल्यानंतर मग ते आतल्या आत खाणार नाही. आतमध्ये ठेवणे - हे देखील नुकसान करणारे आहे. जी मुले सच्ची असतात, ती सर्वकाही बाबांना सांगतात की, या जन्मामध्ये ही-ही पापे केली आहेत. दिन-प्रतिदिन बाबा यावर जोर देत राहतात की, हा तुमचा अंतिम जन्म आहे. तमोप्रधान असलेल्यांकडून पापे तर जरूर होत असतील ना.

बाबा म्हणतात - 'मी अनेक जन्मांच्या शेवटच्या जन्मामध्ये जो नंबरवन पतित बनला आहे, त्याच्यामध्येच प्रवेश करतो कारण त्यालाच पुन्हा नंबरवनमध्ये जायचे आहे'. खूप मेहनत करावी लागते. या जन्मामध्ये पापे झाली तर आहेत ना. कितीतरीजणांना तर कळतही नाही की आपण काय करत आहोत. खरे सांगत नाहीत. काहीजण खरे सांगून टाकतात. बाबांनी समजावून सांगितले आहे - मुलांनो, तुमची कर्मेंद्रिये शीतल तेव्हा होतात,

जेव्हा कर्मातीत अवस्था होते. जसे मनुष्य वृद्ध होतो तर कर्मेंद्रिये आपोआप शीतल होतात. इथे तर लहानपणीच सर्व शांत झाले पाहिजे. चांगल्या रीतीने योगबलामध्ये राहतील तर या सर्व गोष्टींचा शेवट होईल. तिथे असा कोणता घाणेरडा रोग, कचरापट्टी इत्यादी काहीच असत नाही. मनुष्य खूप स्वच्छ-शुद्ध राहतात. तिथे आहेच राम-राज्य. इथे आहे रावण-राज्य, तर अनेक प्रकारचे घाणेरडे रोग इत्यादी होतात. सतयुगामध्ये असे काहीच होत नाही, काही विचारूच नका. नावच किती फर्स्टक्लास आहे - स्वर्ग, नवीन दुनिया. खूप स्वच्छता असते. बाबा सांगत आहेत - 'या पुरुषोत्तम संगम युगावरच तुम्ही या सर्व गोष्टी ऐकता. कालपर्यंत ऐकत नव्हता. कालपर्यंत मृत्यू-लोकचे मालक होता, आज अमर-लोकचे मालक बनता. निश्चय होतो काल मृत्यू-लोकमध्ये होतो, आता संगमयुगात आल्यामुळे अमर-लोकमध्ये जाण्यासाठी तुम्ही पुरुषार्थ करत आहात. शिकवणारा देखील आता मिळाला आहे. जे चांगल्याप्रकारे शिकतात ते पैसे देखील चांगले कमावतात. बलिहारी शिक्षणाची म्हणणार. हे देखील असेच आहे. या शिक्षणामुळे तुम्ही खूप उच्च पद प्राप्त करता. आता तुम्ही प्रकाशामध्ये आहात. हे देखील तुम्हा मुलांशिवाय आणखी कोणालाही माहित नाही आहे. तरीदेखील तुम्ही सारखे-सारखे विसरून जाता. जुन्या दुनियेमध्ये निघून जाता. विसरणे अर्थात जुन्या दुनियेमध्ये जाणे.

आता तुम्हा संगमयुगी ब्राह्मणांना माहित आहे की आपण आता कलियुगामध्ये नाही आहोत. हे कायम लक्षात ठेवायचे आहे की आपण नवीन विश्वाचे मालक बनत आहोत. बाबा आम्हाला शिकवतातच मुळी नवीन दुनियेमध्ये जाण्यासाठी. हा आहे शुद्ध अहंकार. तो आहे अशुद्ध अहंकार. तुम्हा मुलांना तर कधी अशुद्ध विचार देखील येता कामा नयेत. पुरुषार्थ करता-करता सरतेशेवटी रिझल्ट लागेल. बाबा समजावून सांगत आहेत - 'या वेळेपर्यंत सर्व पुरुषार्थी आहेत. जेव्हा परीक्षा होते तेव्हा नंबरवार पास होऊन मग ट्रान्सफर होतात. तुमचे आहे बेहदचे शिक्षण ज्याला फक्त तुम्हीच जाणता. तुम्ही किती समजावून सांगता. बेहदच्या बाबांकडून वारसा घेण्यासाठी नवीन-नवीन येत राहतात. भले दूर राहतात तरी देखील ऐकता-ऐकता निश्चय बुद्धी होतात की, 'अशा बाबांच्या सन्मुख देखील गेले पाहिजे'. ज्या बाबांनी मुलांना शिकवले आहे, अशा बाबांना तर सन्मुख नक्कीच भेटले पाहिजे. हे समजल्यामुळेच इथे येतात. कुणाला समजत नसले तरीही इथे आल्यावर समजतात. बाबा म्हणतात - मनात कोणतीही गोष्ट असेल, समजत नसेल तर भले विचारा. बाबा तर चुंबक आहेत ना. ज्यांच्या भाग्यामध्ये आहे ते चांगल्याप्रकारे आत्मसात करू शकतात. भाग्यात नसेल तर मग खलास. ऐकून न ऐकल्यासारखे करतात. इथे कोण बसून शिकवत आहेत? भगवान. त्यांचे नावच आहे - 'शिव'. शिवबाबाच आपल्याला स्वर्गाची बादशाही देतात. मग कोणते शिक्षण चांगले? तुम्ही म्हणाल - 'आम्हाला शिवबाबा शिकवतात ज्यामुळे २१ जन्मांची बादशाही मिळते. अशाप्रकारे समजावून सांगत घेऊन जातात. कोणी मग पूर्ण न समजल्यामुळे इतकी सेवा करू शकत नाहीत. बंधनाच्या बेड्यांमध्ये जखडून राहतात. सुरुवातीला तर तुम्ही कसे स्वतःला बंधनातून सोडवून आलात. जसे कोणी मस्ताने असतात (ईश्वरीय नशेमध्ये मश्गुल राहणारे असतात). हा देखील ड्रामामध्ये पार्ट होता ज्याने आकर्षित केले. ड्रामामध्ये भट्टी बनणार होती. जिवंतपणी मेले परंतु मग काहीजण परत मायेकडे निघून गेले. युद्ध तर होते ना. माया बघते - याने खूप हिम्मत दाखवली आहे. आता मी सुद्धा ठोकून बघते की हा पक्का आहे का नाही? मुलांना किती सांभाळले जात होते. सर्वकाही शिकवत होते. तुम्ही मुले अल्बम वगैरे बघता परंतु फक्त चित्र बघितल्याने देखील समजू शकणार नाही. कोणीतरी बसून सांगावे की, काय-काय होत होते. कसे भट्टीमध्ये पडलो होतो, मग कोणी कसे निघाले, कोणी कसे. जसे नोटा छापतात तरी देखील काही-काही नोटा खराब होतात. ही देखील ईश्वरीय मिशनरी आहे. ईश्वर बसून धर्माची स्थापना करतात. ही गोष्ट कुणालाच माहित नाही आहे. बाबांना बोलवतात देखील परंतु जसे तवाई (भरकटलेले), समजतच नाहीत. म्हणतात की, हे कसे होऊ शकते. माया रावण एकदम असे बनवते. शिवबाबांची पूजा सुद्धा करतात आणि मग म्हणतात सर्वव्यापी आहेत. 'शिवबाबा', म्हणता मग सर्वव्यापी कसे असतील. पूजा करतात, लिंगाला 'शिव' म्हणतात. असे थोडेच म्हणतात की, यामध्ये शिव बसले आहेत. आता भगवंताला दगड-धोंड्यामध्ये म्हणणे... म्हणजे मग सर्व भगवानच भगवान आहेत काय! भगवान अनलिमिटेड तर असणार नाहीत ना. तर बाबा मुलांना समजावून सांगतात, कल्पापूर्वी देखील असे समजावून सांगितले होते. अच्छा!

गोड-गोड खूप-खूप वर्षानंतर भेटलेल्या मुलांप्रती मात-पिता बापदादांची प्रेमपूर्वक आठवण आणि सुप्रभात. आत्मिक पित्याचा आत्मिक मुलांना नमस्ते.

धारणेसाठी मुख्य सारांश:-

1. १) असे मधुर वातावरण बनवायचे आहे ज्यामध्ये कोणीही क्रोध करणार नाही. बाप समान विदेही बनण्याचा पुरुषार्थ करायचा आहे. आठवणीच्या बळाने आपला स्वभाव गोड आणि कर्मेंद्रिये शीतल करायची आहेत.
2. २) सदैव याच नशेमध्ये रहायचे आहे की, आता आपण संगमयुगी आहोत, कलियुगी नाही. बाबा आम्हाला नवीन विश्वाचा मालक बनविण्यासाठी शिकवत आहेत. अशुद्ध विचार समाप्त करायचे आहेत.

वरदान:- अकाल तख्त आणि दिलतख्तावर बसून सदैव श्रेष्ठ कर्म करणारे कर्मयोगी भव

यावेळी तुम्हा सर्व मुलांना दोन तख्त मिळतात - एक ‘अकाल तख्त’, दुसरे ‘दिल तख्त’. परंतु तख्तावर तोच बसतो ज्याचे राज्य असते. जेव्हा अकाल तख्तनशीन आहात स्वराज्य अधिकारी आहात आणि बाबांच्या दिल तख्तनशीन आहात तर बाबांच्या वारशाचे अधिकारी आहात, ज्यामध्ये राज्यभाग्य सर्व काही येते. कर्मयोगी अर्थात दोन्ही तख्तनशीन. अशा तख्तनशीन आत्म्याचे प्रत्येक कर्म श्रेष्ठ असते कारण सर्व कर्मेंद्रिये लॉ आणि ऑर्डरवर राहतात (कायदा आणि सुव्यवस्थेप्रमाणे कार्य करतात).

बोधवाक्य:- जे कायम स्वमानाच्या सीटवर सेट असतात तेच गुणवान आणि महान आहेत.

||| ओम शांती |||